*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



# UNIT 6

# NYAYA – VAISHESHIK PHILOSOPHY

# न्याय - वैशेषिक दर्शन

1.न्याय दर्शन :

1. प्रमाणाची व्याख्या आणि वर्गीकरण : चार प्रमाणे
2. प्रत्यक्षाचे प्रकार आणि अनुमान
3. अन्यथाख्याति.

2.वैशेषिक दर्शन :

1. सहा पदार्थ,अभाव आणि अभावाचे प्रकार
2. गुण आणि द्रव्याचे प्रकार
3. आत्म्याचे गुणधर्म,अणुवाद
4. न्याय आणि वैशेषिक यांचा संबंध.

---

## न्याय दर्शन

प्रस्तावना

मेधातिथी गौतम ऋषि (इ.स.पू.550) हे न्याय दर्शनाचे प्रणेत होते. *'न्यायसूत्रे '*हा न्यायदर्शनाचा मूळ ग्रंथ आहे.न्याय शब्दाचा अर्थ 'उभय पक्षांना मान्य असणारा निर्णय. ***'नीयते अनेन इति न्याय:'*** अशी न्यायाची व्याख्या आहे. त्याचा अर्थ **''जो आपल्याला निष्कर्षाकडे नेतो तो न्याय''**. हा न्याय कसा मिळवावा किंवा कसा मिळतो,याचेच मार्गदर्शन त्यांच्या वादपध्दतीत मिळते.न्याय दर्शन न्यायप्रक्रियेची तार्किक रचना सविस्तर स्पष्ट करते. भारतीय तत्त्वज्ञानाच्या इतिहासात ते इतके प्रतिष्ठित ठरले की न्याय दर्शनास *भारतीयांचे तर्कशास्त्र* मानले गेले.

न्याय दर्शनात ज्ञानाची मीमांसा महत्वाची आहे. हे दर्शन ज्ञानाचे दोन प्रमुख प्रकार करते.यथार्थ आणि अयथार्थ. यथार्थ ज्ञान म्हणजे *'प्रमा'* आणि अयथार्थ ज्ञान म्हणजे *'अप्रमा'*. हे ज्ञान अनुभव आणि स्मृति या मार्गांनी होते.अनुभव म्हणजे ज्ञानेंद्रियांचा विषयाशी प्रत्यक्ष संबंध येणे.स्मृति म्हणजे ते ज्ञान व संस्कार यांचे संमिश्रण होय. अनुभव बाह्य जगाचा किंवा आंतरिक मानसिक भावांचा असतो. बुध्दी, उपलब्धी व पर्याय हे ज्ञान या संज्ञेचे पर्याय आहेत.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

## 1. प्रमाणाची व्याख्या आणि वर्गीकरण

### प्रमाणाची व्याख्या

मिळणारे ज्ञान नेहमी यथार्थच असते. ते ज्ञान मिळविण्याचे साधन म्हणजे *'प्रमाण'* होय. न्याय दर्शनाच्या मते ज्ञान मुख्यत: जगाचे ज्ञान असते. मिळालेले ज्ञान इतरांना देण्याची आपली इच्छा असते.त्यावेळी ते भाषेत मांडावे लागते.त्यासाठी भाषा तयार करणे आणि भाषेची रचना करणे,ही कामे करावी लागतात.भाषेचे मुख्य काम जगाचे

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

वर्णन करणे हेच असते,असे न्याय दर्शनाचे मत आहे.म्हणूनच भाषा आणि जगाची रचना एकास एक किंवा पूरक असावी लागते.जगाचे ज्ञान मिळविण्याच्या साधनास न्यायदर्शन *प्रमाण* म्हणते. अशी चार प्रमाणे हे दर्शन स्वीकारते.



प्रमाणाचे वर्गीकरण : चार प्रमाणे

**(1) प्रत्यक्ष**
**(2) अनुमान**
**(3) उपमान**
**(4) शब्द .**

या चार प्रमाणांची न्यायदर्शन चर्चा करते.ती भारतीय तत्त्वचिंतनाच्या विकासात मूलभूत व महत्वाची ठरली आहे.त्यामुळे न्यायदर्शनास *प्रमाणशास्त्र* असेही म्हंटले जाते. *'प्रमाणै: अर्थपरीक्षणं न्याय:'* म्हणजे प्रमाणांच्या साह्याने विषयाचे स्वरूप तपासणे व ते निश्चित करणे होय. या अर्थाने न्याय म्हणजे प्रमाणशास्त्र होय.आता आपण प्रत्येक प्रमाणाचे स्वरूप पाहू.

## 2. प्रत्यक्षाचे प्रकार आणि अनुमान

### प्रत्यक्ष प्रमाणाचे स्वरूप :

प्रत्यक्ष म्हणजे ज्ञानेंद्रियांनी मिळणारा प्रत्यक्ष अनुभव.त्यास 'प्रत्यक्ष' म्हणण्याची प्रथा आहे. प्रत्यक्षाची वैशिष्ट्ये अशी :

1) *साक्षातता:* प्रत्यक्षज्ञान नेहमीच साक्षात असते,ते कशाच्याही मदतीने, कोणत्याही माध्यामाद्वारे होत नसते.'' ज्ञानाकरणम् ज्ञानम् प्रत्यक्षम् '' अशी प्रत्यक्षाची व्याख्या केली जाते.
2) *'इंद्रियार्थ सन्निकर्ष'* : प्रत्यक्षज्ञान नेहमी इंद्रियांच्याच साहाय्याने होते.इंद्रिये व अर्थ (वस्तू) यांचा संनिकर्ष हेच प्रत्यक्षप्रमाण होय. इंद्रियांचा ज्ञानविषयाशी थेट संबध येतो. या संबधाला न्यायदर्शनकार *'इंद्रियार्थ सन्निकर्ष '* असे म्हणतात. इंद्रिय + अर्थ + संनीकर्ष = इंद्रियार्थ संनिकर्ष.संनिकर्ष म्हणजे एकमेकांस भिडणे. वस्तूचे ज्ञान होते म्हणजे माझे इंद्रिय त्याच्याशी भिडलेले असते.त्याचवेळी त्याचा अर्थ कळतो.हाच *'इंद्रियार्थ सन्निकर्ष '*होय. ''इंद्रियार्थ सन्निकर्षजन्यम् ज्ञानम् प्रत्यक्षम् '' अशी व्याख्या केलेली आहे.
3) *ज्ञानेंद्रिये:* आपली ज्ञानेंद्रिये एकूण पाच आणि 'मन' हे सहावे इंद्रिय न्यायदर्शनकार मान्य करतात. बाह्य अनुभव नाक,कान,डोळे इत्यादी ज्ञानेंद्रियांनी येतो तर आंतरिक अनुभव मन (मनस्) या इंद्रियाने येतो.
4) *ज्ञानविशिष्टता* : प्रत्यक्ष होणारे ज्ञान नेहमी विशेषच ज्ञान असते.कारण ते विशिष्ट इंद्रियाकडूनच लाभणारे विशिष्ट विषयाचे ज्ञान असते.ज्ञान कधीही 'सामान्य ' असे नसते.सामान्य ज्ञान होण्यासाठी तशा प्रकारचे इंद्रियच नाही !
5) *आत्म्याचा विशेष गुण* : ज्ञान हा आत्म्याचा विशेष गुण आहे.ज्ञान इंद्रियामार्फत होत असले तरी ते इंद्रियांना होते, तर आत्म्याला होत असते.म्हणून ज्ञान हा आत्म्याचा विशेष गुण आहे. हा आत्मा सर्व व्यापी व सदोदित ज्ञानयुक्त म्हणजे नेहमी जागृत असणारा, ज्ञानास तयार असणारा असा आहे. त्याच्या सर्वव्यापीपणाला *'वभु'* असे म्हणतात. आत्मा एकच नसून व्यक्ती तितके आत्मे अनंत आहे.
6) *मन :* न्यायदर्शन *मन हे इंद्रिय स्वीकारते.*वैशेषिक दर्शनाने मनाला द्रव्य मानले आहे,ते न्यायदर्शनास मान्य आहे.प्रत्येक व्यक्तीला मनाच्या अवस्थेनुसार वेगवेगळे ज्ञान होत असते. त्यामुळे मनेसुध्दा अनंत असतात. मन सूक्ष्म अणुस्वरुप असते.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner


*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

7) *इंद्रियांची अतिंद्रियता :* इंद्रियांमार्फत ज्ञान होते पण स्वत: इंद्रियांचे ज्ञान मात्र अतीत असतात.ती अतींद्रिय असतात.ज्यास डोळा म्हणतात ते चक्षुरिंद्रिय नव्हे तर त्या बुबुळाच्या टोकावर चक्षुरिंद्रिय राहाते.तसेच कान म्हणजे कर्णेंद्रिय नव्हे तर कर्णविवरातील अवकाश म्हणजे कर्णेंद्रिय होय. इंद्रियांची अतिंद्रियता हा महत्वाचा शोध होय.



## प्रत्यक्ष ज्ञानाची प्रक्रिया

विभु आत्म्याचा मनाशी संयोग होतो. ज्ञान होते तेव्हा आत्मा मनाशी जोडला जातो. मन कोणत्यातरी एका इंद्रियांशी जोडले जाते आणि इंद्रियाचा संबध वस्तुशी येतो व त्या वस्तुतून प्रकट होणाऱ्या अर्थाशी इंद्रिय जोडले जाते. ही साखळी व्यवस्थित असते तेव्हाच प्रत्यक्ष ज्ञान घडते.




यातील प्रत्येक दुवा आवश्यक आहे. उदाहरणार्थ आत्माच नसेल तर ज्ञान होणार नाही. कारण ज्ञान हा आत्म्याचा गुण आहे. ज्ञान होते ते आत्म्याला. त्यामुळे आत्मा मानावाच लागतो. दुसरा दुवा मन.ते मानले नाही तर आत्मा हा सर्वव्यापी असल्याने त्याला सतत ज्ञान होत राहील. मग कोणत्या ज्ञानाची भर पडली आहे किंवा नाही, याविषयी एकच गोंधळ होतो. तो टाळण्यासाठी मनाची मध्यस्थी आवश्यक असते. मन अतिसूक्ष्म, अणुस्वरुपी असल्याने ते कधी या इंद्रियांशी तर कधी दुसऱ्या इंद्रियाशी संयुक्त होत असते.या प्रक्रियेत मन ज्या इंद्रियांशी जोडले जाते त्याच इंद्रियाच्या विषयाचे ज्ञान त्याला होते. त्याचवेळी आपोआपच इतर विषयाचे ज्ञान टाळले जाते.म्हणून इंद्रिये मानावीच लागतात. इंद्रिये मानली नाही तर ज्ञान कसे होणार ? इंद्रिय भौतिक असते.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

प्रत्येक ज्ञान वेगळे असते.जेवढी इंद्रिये तेवढी ज्ञाने.इंद्रिये मानावीच लागतात.प्रत्येक व्यक्तिला आत्मा,मन व इंद्रिये असतात. व्यक्ति अनंत असतात.म्हणून मनेही अनंत असतात.अनंत प्रकारे मनाकडे ज्ञानाचा प्रवाह चालू असतो.त्यामुळे ज्ञानरचनेत गोंधळ होवू नये, यासाठी मन व इंद्रिये यांचा संबंध केवळ एकाच इंद्रियापुरता मर्यादित असतो.

## प्रत्यक्षाचे प्रकार



अशाप्रकारे प्रत्यक्ष ज्ञानाची प्रक्रिया पूर्ण होते. प्रत्येक दुवा आवश्यक असतो.प्रत्येक व्यक्तीला मनाच्या अवस्थेनुसार वेगवेगळे ज्ञान होत असते.प्रत्यक्ष ज्ञेयविषय विविध प्रकारे अनुभवास येतो या प्रत्यक्षाचे म्हणजे संनिकर्ष प्रकार असे :-

## इंद्रियार्थ संनिकर्षाचे सहा प्रकार

1) संयोग 2) संयुक्त समवाय

3) संयुक्त समवेत समवाय 4) समवाय

5) समवेत समवाय 6) विशेषण विशेष्य भाव.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

न्याय दर्शनकरांच्या मते आपणांस कोणत्याही वस्तुचे किंवा स्थितीचे किंवा कशाचेही ज्ञान होते, तेव्हा या सहा प्रकारचा संबध घडून येत असतो. आपले ज्ञानेंद्रीय या सहापैकी एक किंवा अधिक प्रकाराने त्या ज्ञेय विषयाशी भिडते.पहिला प्रकार चक्षु या इंद्रियाव्दारे ज्ञात होतो,तर चौथा व पाचवा शब्द या प्रमाणाने ज्ञात होतो आणि सहावा संनिकर्ष हा पुन्हा चक्षु इंद्रियानेच ज्ञात होतो, असे न्यायदर्शन कारांचे मत आहे. उदा-समजा समोर एक टेबल आहे.त्याचे ज्ञान आपणांस होते. ते कसे होईल ? ते पुढीलप्रमाणे

### 1) संयोग :

ज्ञानेंद्रियाचा द्रव्याशी येणारा संबंध म्हणजे *'संयोग'*. उदाहरणार्थ टेबलाचे ज्ञान डोळे या इंद्रियास होते. डोळ्यांचा टेबलाशी होणारा संनिकर्ष म्हणजे *'संयोग'*. इंद्रिये आणि ज्ञेयवस्तू यांचा कोणत्याही माध्यमाशिवाय येणारा हा संबंध होय.

### 2) संयुक्त समवाय

इंद्रियाचा ज्ञेयवस्तूशी साक्षात संबंध न येता एखाद्या माध्यमाद्वारे येणे हा *'संयुक्त समवाय'* होय.उदा. फूलाच्या लाल रंगाचे ज्ञान.यात प्रथम संयोग होतो, नंतर समवाय होतो. म्हणजे डोळे व फुल यांचा ' संयोग' संबंध आणि त्याचवेळी फुल व लाल रंग यांचा समवाय संबंध असतो.हा समवाय संबंधाद्वारे लाल फूल असे ज्ञान होते.म्हणजेच द्रव्यातील गुणांच्या जातीचे ज्ञान प्रत्यक्षाने होत असते.काळे,लाल,तांबडे हे गुण समवायाने राहात असतात.त्यांचे ज्ञान ज्या संनिकर्षाने होते. त्यास *'संयुक्त समवाय'* म्हणतात.

### 3) संयुक्त समवेत समवाय

इंद्रिये व ज्ञेयवस्तू यातील संबंध किमान दोन माध्यमांद्वारे येणे हा *'संयुक्त समवेत समवाय'* होय. आधी संयोग संबंध, समवाय संबंध आणि पुन्हा एकदा समवाय संबंध असा तीन प्रकारच्या संबंधाचे ज्ञान म्हणजे *'संयुक्त*

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

*समवेत समवाय' होय.*ज्ञानेंद्रियांचा गुणांशी नव्हे तर गुणांच्या सामान्यत्वाशी , त्यांच्या जातीशी संबंध येणे, त्यांचे ज्ञान होणे हा *'संयुक्त समवेत समवाय'* प्रत्यक्ष होय.

फुलाचा लालरंग लालपणा या रूपत्वात समवायाने राहात असते. रुपावर 'रुपत्व' नावाचा सामान्य गुणधर्म राहत असतो. त्याचेही ज्ञान प्रत्यक्षचं होते. त्या रूपत्वाचे ज्ञान ज्या संनिकर्षाने होते त्या संनिकर्षास *'संयुक्त समवेत समवाय'* म्हणतात.



प्रथम फुल आणि रुप एकत्र ज्ञात होतात. म्हणून त्यास *'संयुक्त समवाय'* म्हणतात. रुपावर पुन्हा त्याचे रुपत्व समवाय संबधानेच असते. ते त्याच्या समवेत असते. म्हणून त्यास *'संयुक्त समवेत समवाय'* म्हणतात.

### 4) समवाय


ज्ञानेंद्रियाचा द्रव्यातील गुणांशी येणारा संबंध म्हणजे *'समवाय'*.गुण द्रव्यापासून वेगळे दाखविता किंवा सांगता येते पण द्रव्यापासून वेगळे करता येत नाही. असा वेगळा न होणारा पण वेगळ्या शब्दात सांगता येणारा संबंध म्हणजे समवाय संबंध होय.यासंबंधाचे ज्ञान म्हणजे *'समवाय'* होय.जसे शब्दाचे ज्ञान कर्ण या इंद्रियाद्वारे होते.ध्वनी हा आकाशात समावाय संबंधाने राहातो.आकाश व ध्वनी वेगळे दर्शविता येतात पण वेगळे करता येत नाहीत.

### 5) समवेत समवाय

आता शब्दावरील शब्दत्व या जातीचे प्रत्यक्ष ज्ञान होते.कान व शब्द यांचा संबंध म्हणजे कान व शब्दत्व यांचा संबंध असतो, तसा कान व शब्द यांचा दुसरा संबंध शब्द व शब्दत्व असा आहे.हे संबंध समवायाने राहातात.दोन्ही संबंध एकमेकासमवेत राहातात, पण वेगळे करता येत नाहीत; म्हणून त्यांना *समवेत समवय* म्हणतात.

### 6) विशेषण विशेष्य भाव

' ज्ञेयवस्तू आहे' हे ज्ञान जसे थेट प्रत्यक्षाने कळते तसे 'ज्ञेयवस्तू नाही' हे ज्ञानसुध्दा प्रत्यक्षानेच कळते, म्हणजे वस्तुचा अभाव सुध्दा प्रत्यक्षाने ज्ञात होतो.उदाहरणार्थ, 'येथे भूतलावर घर नाही'. हे घराच्या नसण्याचे,त्याच्या अभावाचे ज्ञानसुध्दा प्रत्यक्ष प्रमाणाने कळते.भूतल म्हणजे जमीन, हा विशेष्य आहे तर जमिनीवर घराचा अभाव असणे भूतलाचे विशेषण आहे, अशा प्रकारचा संबंध म्हणजे *'विशेषण विशेष्य भाव'* म्हणतात. हे ज्ञान डोळे इंद्रियास थेटपणे होते. म्हणजेच अभावाचे प्रत्यक्ष ज्ञान होते.




Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



या खेरिज आणखीही एका प्रकार वर्गीकरण करण्यात येते. ते पुढीलप्रमाणे ;

1) सविकल्प किंवा सहप्रकारक प्रत्यक्ष
2) निर्विकल्प किंवा निष्प्रकारक प्रत्यक्ष

**1) निर्विकल्प / निष्प्रकारक प्रत्यक्ष :-**

प्रत्यक्ष ज्ञान होण्याच्या अती पहिल्या क्षणी आपणास त्या वस्तुची जी जाणीव होते ती त्या वस्तुंचे नाव, रुप, रंग, चव इ. काहीही सांगणारी नसते.वस्तूचे अस्तित्व कळते पण अर्थ कळत नाही, तिला निर्विकल्प प्रत्यक्ष म्हणतात. या ज्ञानात कसलाही भेद, प्रकार यांचे भान होत राहते. बस्स ! फक्त ''*काहीतरी आहे* ''एवढेच कळते. हे अभेद प्रकार नसलेले एकजीनसी ज्ञान असते. अशा ज्ञानास विकल्पशून्य विकल्परहित असे निर्विकल्प प्रत्यक्ष म्हटले आहे.हे ज्ञान असत्य असू शकत नाही, तो भ्रमही नसतो.

**2) सविकल्प / सहप्रकारक प्रत्यक्ष :-**

त्यानंतर मात्र लगेच ज्ञेय वस्तुचे रुप, रंग इ. कळते. ती वस्तु अमुक आकाराची, प्रकारची रंगाची आहे. असे ज्ञान होते. म्हणजेच त्यात अनेक विकल्प येतात. अशा ज्ञानास सविकल्प किंवा सहप्रकारक ज्ञान म्हणतात.वस्तुचा अर्थ व प्रकार कळतो.असे पाच विकल्प आहेत.

1) जाती 2) द्रव्य 3) गुढ 4) क्रिया 5) संज्ञा. सविकल्प ज्ञान हे अशा प्रकारे वरील पाच विकल्पांनी विशेष ज्ञान बनते म्हणून ते *विशेषण विशेष्य* असेही ज्ञान बनते, ते अर्थातच ज्ञानविशिष्ट ज्ञान असते. अशारितीने कोणतेही ज्ञान प्रथम क्षणी निर्विकल्प आणि उत्तरदक्षिण सविकल्प बनते. या सविकल्प ज्ञानाचे पुन्हा दोन प्रकार आहे.

1) लौकिक सविकल्प प्रत्यक्ष
2) अलौकिक सविकल्प प्रत्यक्ष

लौकिक म्हणजे भौतिक. इंद्रियाच्या मार्गाने भौतिक जगाचे ज्ञान होणे.पंच ज्ञानेंद्रिये + मन हे सहावे इंद्रिय अशी सहा इंद्रिये असल्याने लौकीक सविकल्पक प्रत्यक्ष सहा प्रकारचे असते. ते पुढील प्रमाणे,

| | |
|---|---|
| 1) नाक :-घ्राणज, | 4) कान :- श्रावण |
| 2) जिभ :- रासन | 5) त्वचा :- स्पार्शन |
| 3) चाक्षुष:- डोळा | 6) मन :- मानस |

कोणतेही ज्ञान ही पाच इंद्रिये अधिक मन यांनी आकारला येते. आता, अलौकिक म्हणजे या इंद्रियांनी न होणारे असेही प्रत्यक्ष ज्ञान असते.म्हणून त्यास *अलौकिक सविकल्पक प्रत्यक्ष ज्ञान* असे म्हटले आहे. त्याचे 3 प्रकार आहे.

## अलौकिक सविकल्पक प्रत्यक्ष ज्ञान

***1) सामान्य लक्षण प्रत्यासत्ति* -** गायीमधील गोत्व हा सामान्य धर्म मनाला ज्ञात होतो.वृक्षत्व, अश्वत्व इत्यादी

***2) ज्ञान लक्षण प्रत्यासत्ति* -** ज्ञानाच्या लक्षणाने ज्ञेयवस्तूचे ज्ञान होणे.चंदन दूर असले तरीही त्याचा सुवास लांबून येतो.सुवासिकता हे चंदनाचे लक्षण.तेच बर्फ थंड,अग्नी उष्णतेबाबत.

***3) योगज् प्रत्यक्ष* -** योगबलाने घटना,व्यक्ति इ.चे दूरदर्शन बसल्या जागी घडणे.हे गूढ असते. भूत, भविष्य योग्यांना ज्ञात होते.कुठल्याही इंद्रियाशिवाय होत असले तरी ते

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

'प्रत्यक्ष 'प्रमाणानेच होते, असे न्यायदर्शनाचे मत आहे.

## अनुमान प्रमाणाचे स्वरूप



प्रत्यक्षानंतरचे ज्ञानसाधन म्हणजे अनुमान होय, अनुमान म्हणजे अचूक, योग्य अंदाज. कशाच्यातरी मागून पुढे जात राहणे म्हणजे अनुमान होय. न्यायदर्शन अनुमानाची अतिशय सविस्तर चिकीत्सा करते.त्यामुळे न्याय दर्शनास *'अनुमान शास्त्र '*असेही म्हटले जाते.एखादया वस्तूशी इंद्रियांचा प्रत्यक्ष संबंध न येता त्या वस्तूचे ज्ञान, त्या वस्तूशी नेहमी जोडलेल्या दुसऱ्या वस्तूला पाहिल्यामुळे होणे म्हणजे अंदाज करणे होय.त्यालाच आपण *अनुमान* म्हणतो.मोटार सायकलच्या आवाजावरुन आपण मोटार सायकल न पाहता सुध्दा मोटार सायकल आलेली किंवा गेलेली आहे, हे जाणतो.तसेच धूर दिसत असल्यास तेथे आग लागलेली आहे, हेही कळते.

थोडक्यात, प्रत्यक्ष ज्ञानाच्या आधारे अप्रत्यक्षाविषयी मिळविलेले ज्ञान म्हणजे अनुमान असे साधारणपणे म्हणता येईल. बस, रेल्वे अशाठिकाणी बसण्याच्या जागेवर रुमाल, पिशवी अशी वस्तु दिसली तर ती जागा आपल्या आधी कोणीतरी ताब्यात घेतलेली आहे, असे त्या व्यक्तीविषयीचे ज्ञान होते. अशा ज्ञानास न्याय दर्शनकार *'अनुमिती'* असे म्हणतात. ही अनुमिती ज्या साधनाच्या आधारे केली जाते त्या साधनास 'करण' म्हणतात. म्हणून *अनुमितीचे करण म्हणजे अनुमान* होय.

थोडक्यात, ज्यास सामान्य भाषेत आपण खात्रीशीर अंदाज म्हणतो त्यास न्यायशास्त्रज्ञ अनुमिती म्हणतात. म्हणून अनुमिती म्हणजे प्रत्यक्षावरुन अप्रत्यक्षपणे मिळविलेले ज्ञान. या अनुमितीचे करण ते अनुमान होय.न्याय दर्शनकारांच्या मते, अनुमान ही एक प्रक्रिया आहे.ते विचार करण्याचे तंत्र आहे.त्या तंत्रानुसार विचार केल्यास आपणास योग्य तोच निष्कर्ष मिळतो. एका अर्थाने ते विचार करण्याचे यंत्रही आहे. या प्रक्रियेचे,तंत्राचे किंवा यंत्राचे काही भाग आहेत. हे सर्व भाग प्राप्त केल्याशिवाय व त्यांची परस्पराशी सुसंबधित जुळणी केल्याशिवाय योग्य निष्कर्ष प्राप्त होऊ शकत नाही, असे न्याय दर्शनकारांचे म्हणणे आहे.अनुमानाची रचना पुढील प्रमाणे होते.

1) व्याख्या :- लिंग-लिंगी संबध
2) पाच पदार्थ
3) अनुमानाची दोन अंगे
4) अनुमानाचे प्रकार
5) तर्क दोष / हेत्वाभास

### 1) व्याख्या :- लिंग-लिंगी संबध

प्रत्यक्षाच्या आधारे अप्रत्यक्षाचे ज्ञान म्हणजे अनुमिती. या अनुमितीचे कारण म्हणजे अनुमान केली जातांना आपणासमोर कोणतीतरी खूण किंवा चिन्ह असते. उदा. बसमधील सीटवर टाकलेला रुमाल, पिशवी, किंवा समोरच्या डोंगरावर दिसणारा धुर अशा खूणेला, चिन्हाला *'लिंग'* असे म्हणतात. त्या लिंगाच्या आधारे ज्याचा अनुमिती होते, त्यास *'लिंगी'* असे म्हणतात. म्हणजे लिंग हे ज्याचे चिंन्ह आहे, त्यास *लिंगी* असे म्हणतात. धूर या लिंगाचे अग्नी हा लिंगी आहे. अगदी त्याप्रमाणे बसमधील सिटवरील पिशवी या लिंगाचे तिची मालक व्यक्ती ही लिंगी आहे. अशारितीने लिंगावरुन लिंगीचे ज्ञान मिळवीणे म्हणजे अनुमिती थोडक्यात लिंग-लिंगी = लिंग-लिंगी संबधी. म्हणजे अनुमिती या अनुमितीचे कारण म्हणजे अनुमान होय.

जेव्हा प्रत्यक्ष ज्ञान संपते, तेव्हा अनुमान सुरु होते. अनुमान हे लोकोपयोगी साधन आहे. म्हणून त्याची जास्त चर्चा न्यायशास्त्र करते. दैनंदिन जगण्यात आपणांस नेहमीच हा लिंग-लिंगी संबध म्हणजे अनुमिती किंवा अनुमान

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

अनुभवास येत असतो. या अनुमानाचे विशिष्ट रितीचे तंत्र, मंत्र व यंत्र असून पाच अवयवांनी ते रचले गेले आहे.ते अवयव किंवा पदार्थ पुढीलप्रमाणे :



## 2) अनुमानातील पाच पदार्थ :-

अनमान प्रक्रियेत पाच पदार्थ आहेत. पदार्थ म्हणजे पदाचा शब्दाचा अर्थ.अशी पाच पदे आहेत. ही पाच पदे अनुमानाचे यंत्र रचतात. उदाहरणार्थ ' धूर तेथे अग्नी ' या अनुमानातील पाच अवयव :

1) हेतू - चिन्ह, खूण, लिंग (धुर)
2) साध्य - हेतूच्या आधारे सिध्द होणारे (अग्नी)
3) पक्ष - ज्याठिकाणी साध्य, सिध्द करावयाचे ते ठिकाण (डोंगर)
4) सपक्ष - ज्याठिकाणी साध्य आहे, असे निश्चितपणे माहित असते, ते निश्चित ठिकाण (स्वयंपाकघर)
5) विपक्ष - ज्याठिकाणी साध्य निश्चितपणे नाही, असे म्हणता येत ते ठिकाण, (तलाव, समुद्र)

उदा. धूर तेथे अग्नी असे म्हटले तर यात धूर हे लिंग आहे तर अग्नी हा लिंगी आहे. धुरावरुन अग्नीचे अनुमान होते, म्हणजे 'जेथे जेथे धूर असतो तेथे तेथे अग्नी असतोच' असे सिध्द करावयाचे आहे. हे पुढील घडते.

धूर तेथे अग्नी यात धूर हा '*हेतू*', अग्नी हे '*साध्य*' आहे, आणि धूर समोरच्या डोंगरावर दिसतो म्हणून तो डोंगर हा '*पक्ष*' आहे. आता समोरच्या डोंगरावर धुर दिसतो म्हणून अग्नीसुध्दा तेथेच असला पाहिजे. असे सिध्द करावे लागते. ते होण्यासाठी निश्चित माहिती द्यावी लागते की, जेथे अग्नी असतोच तो *सपक्ष* म्हणजे स्वंयपाकघर, शेकोटी इ. तसेच जेथे अग्नी नाही, तो *विपक्ष* असेही निश्चितपणे सांगता येते, ठिकाण म्हणजे तलाव, नदी, जलाशय किंवा समुद्र.

हे पाच पदार्थ अनुमानाचे तंत्र आणि यंत्र तयार करतात. नैयायिकांच्या मते, हेतूने (धूर) नेहमी पक्षावर (डोंगर) व सपक्षावर (स्वयंपाकघर) रहावे. तरच धूर तेथे अग्नी हे अनुमान सिध्द होते. हेतूने कधीही विपक्षावर राहू नये. तो चुकीचा आहे.

जर हेतू पक्षावर व सपक्षावर राहत असेल *तर आणि तरच* अशा हेतूला *सद्‌हेतू* असे म्हणतात. आणि हेतु जर विपक्षावर राहत असेल किंवा मुळ हेतु नसतांना हेतुसारख्या दिसणारा दुसराच काहीतरी असेल तर त्यास *हेत्वाभास* किंवा दुष्टहेतू असे म्हटले आहे.

थोडक्यात निर्दोष हेतू म्हणजे सद्‌हेतू तर दोषयुक्त हेतु म्हणजे *हेत्वाभास* होय.

## 3) अनुमानाची दोन अंगे

अनुमानाची व्याख्या व पाच पदार्थ निश्चित केल्यानंतर आपण अनुमान करु शकतो. त्यासाठी अनुमानाची दोन अंगे लक्षात घ्यावी लागतात. केशवमिश्र या न्याय तत्वज्ञाने या दोन बाजू सांगितलेल्या आहेत.

1) व्याप्ती
2) पक्ष

### *1) व्याप्ती :-*

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



व्याप्ती म्हणजे हेतू आणि साध्य यांचा नित्य संबध होय. उदा. जेथे धूर असतो, तेथे अग्नी असलाच पाहिजे. जेथे जेथे धूर तेथे तेथे अग्नी हा असतो.पण उलटा कधीही असत नाही.म्हणजे जेथे अग्नी असेल तेथे धूर असलाच पाहिजे, असा नव्हे.गॅस,विजेची शेगडी किंवा पूर्ण फुललेला निखारा येथे अग्नी असतो, पण धुर नसतो, म्हणून *धूर तेथेच अग्नी* असे म्हणावे लागते, अग्नी तेथे धूर असे अनुमान *करता येत नाही.*

येथे हेतु (धूर) आणि साध्य (अग्नी) यांचा नित्यसंबंध म्हणजे *व्याप्ती* होय. हा संबध साहयर्च संबध असतो आणि एकेरी असतो. म्हणून धूराकडून अग्नीकडून धूराकडे जातो.तो उलटा फिरत नाही. साहचर्य म्हणजे धूर असला की अग्नी असणे पण उलटे नव्हे. हेतू आणि साध्य यांच्यातील संबंधाला *'व्याप्य व्यापक संबध'* म्हणतात. यात हेतू हा व्याप्य तर अग्नी हा व्यापक होय. अशारितीने हेतु आणि साध्य यांच्यातील एकेरी नित्य साहचर्य संबध म्हणजे व्याप्य व्यापक संबध होय.असा व्याप्य व्यापक संबध म्हणजे व्याप्ती होय.

*2) पक्ष :-*

अनुमान प्रक्रियेचे दुसरे अंग म्हणजे पक्षधर्म. ज्याठिकाणी आपण साध्याची सिध्दी करु पाहतो, त्याठिकाणी हेतू निश्चित असणे म्हणजे *पक्षधर्मता.*जेथे अग्नी आहे, असे सिध्द करावयाचे आहे, त्या डोंगरावर धूर सुध्दा उपस्थित आहे, असे सिध्द करणे, म्हणजे पक्षधर्मता होय. जर धुरावरुन अग्नीचे अनुमान करावयाचे असेल तर आधी धूर अस्तित्वात असला पाहिजे. आणि ज्या ठिकाणी अग्नीचे अस्तित्व सिध्द करावयाचे आहे त्याठिकाणी - त्या पक्षावरच (धर्म) तो धुर असला पाहिजे;तो इतरत्र असता कामा नये. असा पक्षधर्म म्हणजे त्याठिकाणाच्या पक्षधर्म सिध्द करणे म्हणजे पक्षधर्मता होय. याचाच अर्थ हेतुचे पक्षाच्या ठिकाणी असणे. धुर डोंगरावरचं असणे म्हणजे पक्ष होय.

**'परामर्श'**

व्याप्ती आणि पक्षधर्मता ही अंगे व्यवस्थित चालत असतात तेंव्हाच अनुमान यंत्रणा सुरु होते आणि त्यातून अनुमिती बाहेर पडते. धुर तेथे अग्नी हे अनुमान साध्य व वैध आहे, हे सिध्द करण्यासाठी व्याप्ती व पक्षधर्मता या बाजू भक्कम असल्या पाहिजे. आता, व्याप्तीचे ज्ञान होणे म्हणजे व्याप्ती ज्ञान आणि पक्षधर्मतेचे ज्ञान होणे म्हणजे पक्षधर्मता ज्ञान, नैयायिकांच्या मते, अशी ज्ञाने सुटी असून चालणार नाही, तर ती एकत्रितच झाली पाहिजे. अशा व्याप्ती ज्ञान व पक्षधर्मता ज्ञानाच्या एकत्रित ज्ञानाला न्यायदर्शन *'परामर्श'* असे म्हणतात. म्हणून परामर्श म्हणजे अनुमान होय. अशा अनुमानाचे, परामर्शाचे दोन प्रकार पडतात. ते असे :-

## 4) अनुमानाचे प्रकार :-

अनुमानाने होणारे ज्ञान हे इतरांना सांगण्याची इच्छा निर्मान होते. एकदा ज्ञान झाले की ते इतरांनासाठीही उपलब्ध असले पाहिजे. समाजासाठीही ते उपयोगी पडले पाहिजे,हे ज्ञान स्वत:ला व इतरांना फलप्राप्ती देणारे असले पाहिजे. अशी न्यायदर्शनाची भूमिका आहे. ते इतरांना सांगता यावे म्हणून अनुमानाचे दोन :

1) स्वार्थानुमान 2) पदार्थानुमान

**अ) स्वार्थानुमान :-**

एखाद्या व्यक्तीस स्वत:पुरते होणारे अनुमान म्हणजेच स्वार्थानुमान.ही एक विशिष्ट प्रकारची केवळ स्वत:पुरती असलेली प्रक्रिया आहे.जसे शेकोटी उसाचे गुऱ्हाळ ,स्वयंपाकघर इ. ठिकाणी धूर आणि अग्नी यांचे साहचर्य एखादा माणूस पाहतो आणि जेथे जेथे धुर असतो तेथे तेथे अग्नी असतो *(यत्र यत्र धूम: तत्र वत्र वन्ही:)*

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

असे व्याप्तीज्ञान माणसाला होते.ते त्याच्या स्मरणात राहते. पुढे कधीतरी अन्यत्र धूर पाहून त्याला या गोष्टीची आठवण होते. तो माणूस अनुमान करतो, पण हे ज्ञान त्याच्या स्वत:पुरते असते. म्हणून त्यास *'स्व + अर्थ + अनुमान = स्वार्थानुमान'* असे म्हणतात.

थोडक्यात व्याप्तीज्ञानाने व्यक्तीला होणारे स्मरण आणि त्यायोगे होणारा परामर्श म्हणजे स्वार्थानुमान किंवा स्वार्थानुमिती होय.



## ब) पदार्थानुमान :-

'पर + अर्थ + अनुमान = परार्थानुमान. एकदा स्वार्थानुमती झाली की ती इतरांनाही त्या व्यक्तीचे ज्ञान करुन देण्याची इच्छा साहजिकच व्यक्तीला होते. त्यासाठी अर्थातच भाषा वापरावी लागते. भाषेत वाक्ये, विधाने इ. घटक असतात. दैनंदिन बोलण्यात आपण भाषेची कशीही ओढताण करतो. एखादा शब्दही बोलण्यास पुरतो. क्वचित अलंकारीकही भाषा वापरली जाते. पण नैय्यायिक अशी भाषा करीत नाहीत. त्यांच्यामते, ज्ञान ही मोठया कष्टाने मिळविलेली गोष्ट असते. त्यामुळे भाषेची उधळण न करता मोजक्या शब्दात वाक्यातच आपणांस झालेले ज्ञान इतरांना देण्यावर भर दिला जावा. त्यासाठी ते वाक्याची एका विशिष्ट प्रकारे मांडणी करतात. अशी पाच वाक्ये आहेत.ती वरवर पाहाता वेगवेगळी पाच वाक्ये दिसत असली तरी अनुमान म्हणून ही सर्व वाक्ये मिळून एकच बनते. म्हणून त्यास *'पंचावयवी वाक्य'* म्हणतात. हे वाक्य इतरांना अनुमिती / अनुमान करुन देण्यास उपयुक्त ठरते. म्हणून त्यास परार्थानुमान असे नाव आहे, ही वाक्ये / अवयव पुढील प्रमाणे

1) प्रतिज्ञा 2) हेतू 3) उदाहरण वाक्य 4) उपनय 5) निगमन

1) **प्रतिज्ञा:-** प्रतिज्ञा म्हणजे साध्याचे सिध्दीपुर्वक कथन करणे, उदा - त्या पर्वतावर अग्नी आहे.

2) **हेतू :-** ज्या लिंगाच्या आधारावर साध्य सिध्य केले जाते, ते लिंग किंवा चिन्ह उदा-धूर

3) **उदाहरण वाक्य :-** हेतु आणि सिध्दी यांचा संबंध साधणारे एखादे उदाहरणाचे वाक्य. हे वाक्य प्रतिज्ञा पूर्ण करण्यास उपयोगी पडणारे असते. जसे स्वयंपाक घरातील धूर आणि अग्नी.

4) **उपनय :-** उपनय म्हणजे जवळ आणणे. (नय म्हणजे बाजू,दृष्टिकोन व उप म्हणजे जवळ). धूर व अग्नी यांचा संबंध सिध्द करण्यासाठी व्याप्ती लागू पडते, असे दर्शविणे, म्हणजे या पर्वताच्या ठिकाणी अग्नीयुक्तंच धुर आहे, असे दाखविणे.

5) **निगमन :-** निगमन म्हणजे खाली येणे. अनुमिती झाले म्हणजे अनुमान झाले की आपण पक्षाच्या ठिकाणी म्हणजे डोंगराच्या ठिकाणी उतरतो. *जेथे जेथे धुर असतो तेथे तेथे अग्नी असतो* या व्यापक स्वरुपाच्या सामान्य सिध्दांतापासून आपण या पर्वतावरील धूर पाहून *येथे अग्नी असणार* अशा विशिष्ट ठिकाणी उतरतो,निष्कर्ष काढतो. यास *निगमन* म्हणतात. मोठयाकडून छोटयाकडे येणे म्हणजे निगमन होय.

पाच अवयव सांगितले की, त्याची पुढीलप्रमाणे रचना करावी लागते, तरचं परार्थानुमान मिळते. ते असे :

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



## परार्थानुमानाची रचना

1) *प्रतिज्ञा :-* त्या पर्वतावर अग्नी आहे
2) *हेतु :-* कारण तेथे धुर आहे
3) *उदाहरण :-* जसे स्वयंपाक घर
4) *उपनय :-* पर्वताची गोष्ट स्वंयपाकघरासारखीच आहे.
5) *निगमन :-* (म्हणून) त्या पर्वतावर अग्नी आहे.

प्रतिज्ञा, हेतु, उदाहरण, उपनय, निगमन असे पाच अवयव असलेले हे सगळे मिळून एकच वाक्य आहे. म्हणून त्यास *पंचावयवी वाक्य* असे म्हणतात. खंडन-मंडन करतांना हे वाक्य युक्तिवाद म्हणून उपयोगात येते. युक्तिवाद करणे म्हणजेच याप्रकारे निष्कर्ष काढणे.

न्यायदर्शनाच्या मते, आपण जर कोणताही युक्तिवाद किंवा आपले म्हणणे या अनुमानयंत्रात बसविले, आपल्या म्हणण्याचे अवयव निश्चित केले तर आपणांस हवा असलेला योग्य निष्कार्ष मिळु शकतो. प्रतिपक्षालाही या अनुमान प्रक्रियेतील वस्तुनिष्ठा मान्य असल्याने तो सुध्दा येणारा निष्कर्ष मान्य करतो, ही अनुमान प्रक्रिया आपणांस योग्य निष्कर्षाकडे नेते म्हणून अशा अनुमानास / पंचावयवी वाक्यास न्याय असे म्हणतात. संस्कृत मधील 'नी' या धातुचा अर्थ नेणे असा असून 'नी' पासून न्याय हा शब्द बनतो.या न्यायावरच, तर्कावरच हे दर्शन भर देत असल्यामुळे या दर्शनास *न्यायदर्शन* किंवा *न्यायशास्त्र* असे म्हणतात.

आता, पंचावयवी वाक्याने दुसऱ्यासाठी परार्थानुमान केले जाते. पण त्यातही प्रकार आहेत. हे प्रकार हेतुच्या प्रकारावरुन केलेले आहे. ते पुढील प्रमाणे,

*1) अन्वय व्यतिरेकी हेतू*
*2) केवल अन्वय हेतू*
*3) केवल व्यतिरेकी हेतू*

### *1) अन्वय व्यतिरेकी हेतू :-*

अन्वय असणे, म्हणजे एक असेल तेथे दुसऱ्यांने असणे, हेतू असेल तेथे साध्याने असणे म्हणजे अन्वय असणे, जसे धुर असेल तर अग्नी असलाच पाहिजे.व्यतिरेक म्हणजे एक जण नसेल तर दुसऱ्याने सुध्दा नसणे. जसे धुर नसेल तर अग्नीही नसेल. अन्वय व व्यतिरेक दोघांनी मिळून होणारा हेतू म्हणजेचं अन्वय व्यतिरेकी हेतू किंवा अन्वय व्यतिरेकी परार्थानुमान, ते खालील प्रमाणे,

जेथे धुर असेल तेथे अग्नी असतो.
ज्याअर्थी समोर धूर दिसतो, त्याअर्थी तेथे अग्नी आहेच.

### *2) केवल अन्वय हेतू :-*

केवळ अन्वय सांगणे म्हणजे *केवलान्वयी अनुमान,* म्हणजेच जेथे हेतू आहे तेथे साध्य असले तरी साध्य नसेल आणि हेतू आहे की नाही हे सांगता न येणे म्हणजेच केवलान्वयी अनुमान होय.ते पुढील प्रमाणे,

1) धूर आहे पण अग्नी नाही, असे नसते.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

2) धुररहित अग्नी नसतोच, म्हणून जर धूर नसेल तर अग्नी नाही.

### 3) केवल व्यतिरेकी हेतु व अनुमान :-

अन्वयाच्या विरुध्द असणे म्हणजेच व्यतिरेक.धूर तेथे अग्नी या अन्वयाच्या विरुध्द किंवा या अन्वयाचा व्यतिरेक म्हणजे अग्नी नाही तर धूरही नाही. असा होतो जसे समोर अग्नी नाही म्हणून धूरही नाही.

या केवल व्यतिरेकी अनुमानाने न्यायदर्शनकार अन्वय व्यतिरेक सिध्द करतात. म्हणजेच ते धूर तेथे अग्नी हे सिध्दच करतात. इतरांना ज्ञान करुन देताना आपण वरील प्रमाणे युक्तिवाद केला पाहिजे. हेतु असेल तर साध्य असलेचं पाहिजे आणि नसेल तर हेतूही नसणारचं, असे पटवून देते असे न्यायदर्शन म्हणते. अशा प्रकारचा हेतू म्हणजेच निर्दोष हेतू होय. आणि निर्दोष असेल तरचं हेतू साध्याची सिध्दी करु शकतो. अशा हेतुला ते सद्हेतू असे म्हणतात. त्याचे स्वरुप पुढीलप्रमाणे,

## सदहेतूचे स्वरुप व लक्षण

निर्दोष हेतु म्हणजे सदहेतु. आता हेतू निर्दोष आहे हे कसे ठरवायचे. कोणता हेतु निर्दोष आहे,याचे पाच निकष / लक्षणे न्यायदर्शनांनी पुढील प्रमाणे सांगितले.

**1) पक्षधर्मत्व :-**

हेतुने पक्षाच्या ठिकाणी *वास्तवात* उपस्थित राहणे. म्हणजे धुराने डोंगरावर असणे.

**2) सपक्षसत्व :-**

हेतु *सपक्षावर सुध्दा* असणे, म्हणजे धुराने स्वयंपाकघरातही असणे.

3) **निपक्ष व्यावृत्ती** :-

साध्य नसलेल्या एकाही ठिकाणी हेतु नसणे. म्हणजे पर्वताशिवाय अन्य कोठेही *त्या क्षणाला* धुर नसणे.

**4) अबाधित विषयत्व :-**

साध्याच्या *विरुध्द गुणधर्म* साध्याच्या ठिकाणी नसणे. जसे अग्नी उष्ण आहे. ज्या ऐवजी अग्नी थंड आहे, असे न म्हणणे.

5) असत् प्रतिपक्षत्व :-

दिलेल्या अनुमितीच्या विरोधी अनुमिती देण्यास हेतु नसणे. याचा अर्थ असा की, समोरच्या पर्वतावर धुर दिसतो आहे म्हणून तेथे अग्नी आहे. या अनुमितीच्या ऐवजी त्या पर्वतावर सिंह राहतो कारण त्याची पावले तेथे दिसत आहे. असा निष्कर्ष अनुमितीत येतो.

ही लक्षणे असणारा हेतु म्हणजेचं सद्हेतुवरील लक्षणांमध्ये काही अटी आवश्यक आहेत तर काही अटी अनावश्यक आहेत.ज्या आवश्यक आहेत त्या असल्याच पाहिजे आणि ज्या अनावश्यक आहेत,त्या नसल्याच पाहिजे. या दोन्ही अटी पूर्ण होत असतील तर आणि तरच हेतु निर्दोष असतो.

पण खंडन-मंडन करतांना कधी कधी प्रतिपक्ष अजाणते अथवा हेतूत: हेतू सदोष करतात.हेतु सदोष झाला की तो हेतु मग ‘हेतू’च राहत नाही.तो हेतुचा भास निर्माण करतो. अशा हेतुलाच ‘हेत्वाभास’ असे म्हणतात. हा

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

हेत्वाभास चुकीचा तर्क देणारा , चुकीचा निष्कर्ष देणारा ठरतो. त्यास *तर्काभास / तर्कदोष* असे म्हणतात.असे अनेक तर्कदोष आहेत.

## अन्यथाख्याति



आपणास जसे ज्ञान होत असते. तसे ज्ञान झाले आहे पण वास्तवात झालेले नाही असे ही घडत असते. त्यास आपण भास किंवा भ्रम असे म्हणतो.भ्रम म्हणजे ज्ञानाचा आभास असतो.ज्ञानासारखे दिसणारे पण फसवणारे असे ते काहीतरी असते.म्हणून आपणांस जेव्हा ज्ञान होते. तेव्हा खरोखरच ज्ञान होते आहे की,ज्ञानाचा भास होत आहे, हे समजावून होणे आवश्यक आहे. याचाच अर्थ, ज्ञान प्रक्रियेत जसा ज्ञान होणे या घटनेचा विचार केला जातो तसा भ्रमाचाही विचार करणे आवश्यक असते.

भ्रमाच्या सिध्दातांना तत्वज्ञानात *ख्यातीवाद*[1] असे म्हटले आहे. भ्रमाविषयी चार्वाक दर्शन वगळता प्रत्येक दर्शनाने यासंबंधात विविध प्रकारची मते व्यक्त केलेली आहे. भारतीय तत्वज्ञानात पाच प्रकारच्या ख्याति आहेत.ते पाच प्रकार पुढीलप्रमाणे :

1)अन्ययाख्याति 2) अख्याति 3)आत्मख्याति
4)अनिर्वचनख्याति 5)असत्ख्याति.

## अन्यथाख्याति :-

आपणास भ्रम कसा होतो,भ्रम खराच होतो की तोही भ्रमच असतो? अशी समस्या न्यायदर्शन उपस्थित करते. यासंदर्भात त्यांची ज्ञानाची संकल्पना समजावून घेणे आवश्यक आहे.

## न्यायदर्शनातील ज्ञानाची संकल्पना

नैय्यायिकांच्या मते, 'ज्ञान' हा आत्माचा गुण असून ज्ञान ही त्यांच्या मते एक वस्तु आहे. तिचे दोन भाग आहेत. 1)अनुभव 2) स्मृती आधी अनुभव येतो, मगचं त्याचे स्मरण होते.ज्याचा अनुभव नाही, त्याचे स्मरण सुध्दा नाही. अनुभव हा यथार्थ व अयथार्थ असा दोन प्रकारचा असतो. यथार्थ अनुभव म्हणजे सत्य ज्ञान व अयथार्थ अनुभव म्हणजे असत्य व चुकीचे ज्ञान त्यालाच *भ्रम ज्ञान* म्हणतात.

यथार्थ ज्ञान एका विशिष्ट स्वरुपाचे असते. नैय्यायिकांच्या मते, कोणत्याही अनुभवाचे किंवा ज्ञानाचे दोन भाग असतात. 1) ज्या कशाचे ज्ञान होते ते 2) ज्या रितीने ते ज्ञान होते ती रिती.

ज्या कशाचे ज्ञान होते. त्या ज्ञेय वस्तुस *'इदम्'* असे म्हणावयाचे तर ज्यारितीने हे ज्ञान होते त्यास *'आकार'* असे म्हणावयाचे.एखादी वस्तु अस्तित्वात असते तेव्हा ती नुसतीचं अस्तित्वात असते असे नाही तर तिच्या

---

[1]ख्याति हा शब्द 'ख्या' या हेतुला 'क्तिन' हा प्रत्यय लावून तयार झालेला आहे, ख्या म्हणजे कळविणे सांगणे, प्रसिध्द करणे होय. म्हणून ख्याति म्हणजे प्रसिध्द होणे.अर्थात हा ख्याति शब्दाचा सर्वसामान्य अर्थ झाला. पण तत्वज्ञानात मात्र ख्याति हा शब्द संदिग्ध आहे. तो ज्ञान आणि भ्रम या दोन्ही अर्थाने वापरला जातो. ख्याति होणे म्हणजे प्रसिध्द होणे.पण ही प्रसिध्दी विविध व्यक्तींना एकसारखीच होते,असे नाही ती वेगवेगळी होते. म्हणजेच ती अनेकांनी वेगवेगळी भासते. त्यामुळेचं ते जे काही कळते ते ज्ञान आहे की भास ? असा संशय निर्माण होतो म्हणूनच ख्याति हा शब्द 1) ज्ञान आणि 2) भास किंवा भ्रम या दोन्ही अर्थाने वापरला जातो.हे पहिले कारण . दुसरे कारण म्हणजे भारतीय तत्वज्ञानात ख्याती हा मुळात सामाजिक शब्द आहे.सामाजिक प्रसिध्दी ही संशयास्पद असते. या कारणांमुळेच ख्याति हा शब्द इंग्लीशमधील error, illusion या शब्दांशी समानअर्थी आहे. म्हणून ख्यातिवादास इंग्लीश मध्ये Theories of Err असे म्हटले आहे.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



अस्तित्वात असण्याची विशिष्ट पध्दतीसुध्दा असते. ती पध्दती आणि ज्ञान जर एकरूपच असतील तर आणि तरच ते ज्ञान यथार्थ असते. म्हणजेच ज्ञानाचा विषय व ज्ञानाचा आकार तंतोतंत जुळणारा असला पहिजे.

थोडक्यात, आपल्या अनुभवातील इदम आणि आकार जेव्हा एकरूपच असतात, तेव्हा होणारे ज्ञान सत्य ज्ञान किंवा यथार्थ ज्ञान असते. असे जेव्हा नसते,तेव्हा त्यास *भ्रम* असे म्हटले जाते.

## भ्रमाचे स्वरुप

इदम् आणि आकार समसमान जुळले तरच ज्ञान सत्य असते. उदा. समुद्रकिनारी आपण गेलो असतो तर आपणास एकदमच चांदीचे तुकडे आढळतांना दिसतात. आपण धावत जाऊन ते बघतो मग लक्षात येते की, तो शिंपला आहे. जेव्हा शिपंल्याचे (शुक्ती) ज्ञान शिंपला म्हणून होते, ते चांदीचे (रजत) ज्ञान नसते. शुक्ती ज्ञानात इदम् आणि आकार दोन्ही शुक्ती म्हणूनच अनुभवास आल्यास की त्यास यथार्थ ज्ञान म्हणता येईल.

पण आधी आपणास चांदी भासते.नंतर शिंपल्याचे ज्ञान होते. या चांदीच्या ज्ञानाला भ्रम असे म्हणतात. आता, प्रश्न असा की समोर शिपंले असतांना आणि चांदी नसतांना चांदी भासतेचं कशी? हीच *भ्रमाची समस्या* आहे. असा भ्रम का होतो?

याचे नैय्यायिकांचे उत्तर असे की भ्रमात्मक ज्ञानाच्या ठिकाणी जो *इदम्* चा अंश असतो, त्यासंबधी भ्रम होत नाही. तो अंश जसाच्या तसा असतो तो कायम राहतो. भ्रम होतो तो आकाराबाबत ! नंतर ज्यावेळेस हे शिंपले आहेत चांदी नाही, असे कळते. त्यावेळेस रजत - चांदी या ज्ञानाला बांधा आलेली असते, ते गायब झालेले असते !! म्हणजे अनुभव येतो तो शिंपल्याचा पण ज्ञान होते चांदीचे. असा भ्रम का होतो?

यात एक सूक्ष्म गोष्ट घडते. भ्रम होतो म्हणजे स्मृतीज्ञान होत असते.स्मृती कशाची होते ? तर पूर्वानुभवाची ! तो कोठून मिळाला? तर सोनाराच्या दुकानातून. आपण पुर्वी कधीतरी सोनाराच्या दुकानात चांदी पाहिलेली असते.पण विसरून गेलेलो असतो.त्याचेच स्मरण आपणांस शिपंले पाहतांना होते.शिंपल्याच्या ठिकाणी चांदी दिसते. असते शिंपले पण चांदीचे ज्ञान स्मरणाने होते.

सोनाराच्या दुकानातील अगदी पहिल्या चांदीच्या अनुभवाचे ज्ञान सुध्दा खरेच असते.आता मिळत असलेले शिंपल्याचे ज्ञान सुध्दा खरेच असते.[2] शिपंल्यात ते मिसळते. शिंपल्याच्या जागी त्या क्षणाला चांदी नसली तरीही *अन्यत्र कोठे तरी ती असतेच* म्हणूनच रजत ज्ञानास *अन्यथा* असे म्हणतात. ही ख्याति,म्हणून अन्यथा ख्याति होय.

थोडक्यात आत्ता येथे शिंपले (शुक्ती) असले तरी अन्यत्र (सोनाराच्या दुकानात) रजत असते. तेच फक्त भासते.नसते, पण अवतरते.इदम् आणि आकार दोन्हीही वास्तव आहे.येथे फक्त एकत्र नसतात. ख्याती होते पण अन्यथा होते असे न्यायदर्शन सांगते.

----------------------------------------

# वैशेषिक दर्शन

### प्रस्तावना

विशेष शब्दापासून वैशेषिक ही संज्ञा बनते.'सामान्य' च्या विरुध्द विशेष. जे विशेषाविषयीचे तत्त्वज्ञान ते वैशेषिक दर्शन होय. न्याय - वैशेषिक ही एकत्र समजली जातात.वैदिक दर्शनातील ही पहिली जोडगोळी मानली जाते.कणाद ऋषीनी *'वैशेषिक सूत्रे'* रचली.कणादाचे दुसरे नाव उलूक होते.उलूक म्हणजे घुबड.जो घुबडासारखा

[2] ज्ञान नेहमी सत्यच ज्ञान असते, हा न्यायदर्शनाचा सिध्दान्त आहे, त्यानुसार दोन्ही ज्ञाने सत्यच असतात.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



रात्रीच हिंडतो तो उलूक,असा समज आहे.दुसरा समज असा की कणादाच्या पित्याचे नाव उलूक होते.त्याच मुलगा म्हणून त्याच्या तत्त्वज्ञानास 'औलुक्य दर्शन' असेही नाव आहे.घुबड केवळ कण खावून जगते त्यामुळे परमाणुवादी असलेल्या कणादऋषींना *कणाद* हेही नाव मिळाली, असाही समज आहे.कणादाचा काळ सांगता येत नाही.पण तो इ.स.पू.कालातील असावा.

'विशेष' याचा अर्थ प्रत्येक वस्तूचे इतरवस्तूंपासून वेगळेपण सांगणे.तसेच प्रत्येक पदार्थ कोणकोणत्या विशेष परमाणुंपासून किंवा अणुपांसून तयार झाला आहे सांगणे होय.जगातील प्रत्येक वस्तू दुसऱ्याहून भिन्न आहे,म्हणूनच ती विशेष आहे.अशा अनेक विशेषांनी हे जग तयार झाले आहे,हेच या जगाचे वैशिष्ट्य आहे.विशेष हा शब्द ज्या धातुपासूनच बनतो,त्यापासूनच वैशिष्ट्य, विशिष्ट हे शब्दही बनतात, हे लक्षात घेतले पाहिजे.

वैशेषिकांच्या मते जगातील प्रत्येक वस्तू आणि मानवी मन सूक्ष्म अशा परमाणूंनी बनलेले आहे. प्रत्येक वस्तूचे परमाणु स्वतंत्र असतात. याचाच अर्थ जितक्या वस्तू तितके परमाणु आहेत.म्हणजे अनंत परमाणु आहेत.ही परमाणुंची अनेकता किंवा बहुलता (Pluralism) आहे. म्हणून वैशेषिकांच्या जगाच्या रचनेच्या सिध्दान्तास **'परमाणुप्रधान बहुलतावाद ( Atomic Pluralism)'** असेही नाव आहे.

## सहा पदार्थ आणि अभाव (सप्तपदार्थ)

वैशेषिकांनी विश्वाची सात प्रकारात विभागणी केली.जगातील वस्तु आणि घटना यांचे या वर्गीकरणास ' सप्त पदार्थ ' म्हणतात. पदार्थ म्हणजे category, अनेक पदार्थ म्हणजे categories. पदार्थ याचा अर्थ पदाचा अर्थ.पद म्हणजे शब्द.शब्दाला अर्थ असणे म्हणजे पदार्थ.जे जे शब्दांनी वाच्य आहे (पदस्य अर्थ:।) ते ते पदार्थ होय.पदार्थ म्हणजे सर्व ज्ञेय वस्तू.ज्याच्या ज्याच्यासंबंधी म्हणून आपण बोलू शकतो ते यच्चयावत् पदार्थच असतात. थोडक्यात म्हणजे सर्व काही, आपला सारा अनुभव.

अर्थ म्हणजे ज्या वस्तूचे किंवा विषयाचे आकलन होते ती वस्तू किंवा विषय होय.म्हणजेच जो ज्ञानाचा/अनुभवाचा विषय होवू शकतो त्याला *पदार्थ* असे नाव वैशेषिक देतात.एखाद्या वस्तूला नाव देता येवू शकत असेल तरच त्याला पदार्थ म्हणता येते, अन्यथा नाही, असे वैशेषिक म्हणतात.नाव देता असेल तरच ती विशिष्ट वस्तू असते.वस्तू असणे याचा अर्थच नाव देता येणे. यास *'अभिधेयत्व'* असेही म्हंटले आहे.

थोडक्यात कोणतीही किंवा सर्व ज्ञेयवस्तू म्हणजे पदार्थ होय.भौतिक जगताचा आपला सारा सत्य अनुभव हा ज्ञानात्मक पदार्थच असतो.वैशेषिकांच्या मते विश्वात असे सात पदार्थ आहेत की ज्यांच्या वर्गीकरणात जगातील साऱ्या वस्तूंचे,घटनांचे आणि व्यक्तिचे वर्गीकरण होते. हे वर्गीकरण पूर्णपणे सर्वसमावेशक असून त्यांच्याबाहेर जगात काहीच उरत नाही. हे सात पदार्थ पुढीलप्रमाणे :

(1) द्रव्य (2) गुण
(3) कर्म (4) सामान्य
(5) विशेष (6) समवाय (7) अभाव .

वैशेषिक सूत्रात प्रथम पहिल्या सहाच पदार्थांचा समावेश होता.नंतर अभाव या समावेश केला गेला. यातील प्रत्येकाचे स्वरुप पुढीलप्रमाणे :

### (1) द्रव्य (Substance):

ज्यापासून वस्तू अथवा घटना तयार होते ते मूलद्रव्य म्हणजे द्रव्य होय.आपण घेत असलेला अनुभव हा नेहमी कोणत्या तरी द्रव्याचाच असतो.उदाहरणार्थ खुर्ची, टेबल,बाकडे इत्यादी लाकडी वस्तूतील द्रव्य लाकूड हे

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

आहे.तसे सोने, लोखंड, प्लॅस्टीक इत्यादी.द्रव्याचे रूप बदलते पण द्रव्य तेच राहाते,ते बदलत नाही.द्रव्यांनंतरचे पुढील दोन द्रव्ये गुण व कर्म हे द्रव्याच्या आधारे राहातात.म्हणजे कोणताही गुण अथव कर्म बिनद्रव्याचे असू शकत नाही.अशी नऊ द्रव्ये आहेत : (1) पृथ्वी (2) जल (3) तेज (4) वायु (5) आकाश (6) दिक् (7) काल (8) आत्मा आणि (9) मन .

### (2) गुण (Quality) :

गुण हे दुसरे द्रव्य नेहमी पहिल्या द्रव्यावर आधारित असते.पण द्रव्यावर अवलंबून असल तरी तो ते द्रव्य निर्माण करीत नाही.कमळ लाल आहे,या विधानात लाल हा गुण आहे. तो कमळ,कुंकू,कापड,पेन इत्यादी द्रव्याच्या आधारेच राहू शकतो.स्वतंत्ररित्या लाल नावाचा गुण अस्तित्वात राहू शकत नाही.असे 24 गुण आहेत

(1) रूप (2) रस (3) गंध (4) स्पर्श (5) संख्या (6) परिमाण (7) पृथकत्व (8) संयोग
(9) विभाग (10) परत्व (11) अपरत्व (12) गुरुत्व (13) द्रवत्व (14) स्नेह (15) शब्द (16) बुध्दि
(17) सुख (18) दु:ख (19) इच्छा (20) द्वेष(21) प्रयत्न (22) धर्म (23) अधर्म (24) संस्कार.

### (3) कर्म (Action) :

कर्म म्हणजे क्रियाशीलता, हालचाल करणे.कर्म करणे.आकुंचन,प्रसरण,गमन इत्यादी कर्माचे प्रकार आहेत.कर्म द्रव्याच्या आधारे राहते.याचा अर्थ असा की कर्म नावाची स्वतंत्र वस्तू नसून ते कोणत्यातरी द्रव्यातच असते.काहीच नाही आणि कर्म चालू आहे असे कधीही घडत नाही.

### (4) सामान्य (Universal):

सामान्य म्हणजे अनेक वस्तूंमध्ये असणारे समानतेने असणारे तत्त्व. अनेक गायींमध्ये गोत्व किंवा गायपणा हे सामान्य असते.बकरीमधील बकरीपणा सामान्य असतो.अनेक खुर्च्यांमधील खुर्चीपणा, टेबलांमधील टेबलपणा इत्यादी.हे सामान्य नित्य (नष्ट न होणारे किंवा शाश्वत ),अनेकांमध्ये राहणारे आणि संख्येने एकच असणारे असे असते.

अनेक गायींपैकी एखादी विशिष्ट गाय हे गोत्व या 'सामान्य ' चे 'विशिष्ट' उदाहरण असते. सामान्य हे नेहमी त्याच्या विशिष्टामार्फतच अनुभवाला येत असते. त्याला स्वतंत्र अस्तित्व नसते.ते नेहमीच कोणत्यातरी द्रव्यामार्फत (उदा.गाय,खुची) कळत असते. हे सामान्य द्रव्यामार्फत अनुभवाला येते याचाच अर्थ ते गुण व कर्म यांच्याही मार्फत अनुभवाला येत असते.

सामान्य हा पदार्थ जातिवाचक आहे.त्याचा अर्थ असा की 'जाति ' (class) ला समानार्थक असते. नित्य याचा अर्थ समजावून घेतला पाहिजे. तो असा की ते सामान्य ज्यांचे असते ते विशिष्ट संख्येने कितीही कमीजास्त झाले तरी सामान्य संपून जात नसते.सगळे विशिष्ट नष्ट झाले तरी सामान्य नष्ट होत नसते. किंवा उदाहरणार्थ जगातील गायी (अथवा डायनासोर) नष्ट झाले तरी डायनासोर हे सामान्य नष्ट झालेले नाही. म्हणूनच त्या विषयवर सिनेमा काढणे शक्य झाले आहे.

( हाच नियम वास्तवातील जातीना (Caste) लावला तरी तेच दिसेल.वैशेषिकांनी 'जाति' ही सत्ताशास्त्रीय संकल्पना चार्तुवर्ण्याला म्हणजे चार धार्मिक सामाजिक वर्गानीही लागू केले .ब्राह्मणत्व, क्षत्रियत्व, वैश्यत्व,शूद्रत्व या जाति आहेत, म्हणून त्या नष्ट होणार नाहीत असेही मानले. पण बौध्दांनी व जैनांनी 'जाति' या सत्ताशास्त्रीय पदार्थाला विरोध केला आणि जाति नाकारल्या.)

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



### (5) विशेष (Particular) :

विशेष हा पदार्थ सामान्य पदार्थाच्या विरुध्द पदार्थ आहे.एक विशिष्ट हे नेहमीच दुसऱ्या विशिष्टापेक्षा वेगळे असते.प्रत्येक पदार्थ वेगळा दाखविणे याचाच अर्थ विशेष दाखविणे असते.विशेषामुळेच एक वस्तू अथवा व्यक्ति दुसऱ्यापासून वेगळी आहे,हे आपण दाखवू शकतो.विशेष हा प्रत्येक नित्यद्रव्यात राहतो.म्हणजे उदाहरणार्थ प्रत्येक पमाणूत एक त्याचा त्याचा विशेष असतो की ज्यामुळे तो परमाणु दुसऱ्या परमाणूपासून वेगळा ठरतो.

### (6)समवाय (Inherence) :

समवाय हा पदार्थ एक प्रकारचा संबंध असतो.हा संबंध अस्तित्वात येण्यासाठी कमीत कमी दोन वस्तू,व्यक्ति, कल्पना लागतात आणि त्यांचा संपर्क व्हावा लागतो.साधारणपणे दोन गोष्टी संबंध आला की त्यास संयोग म्हंटले जाते.उदाहरणार्थ ताट व वाटी,हात व पुस्तक , नवरा व बायको इत्यादी. त्या वेगळ्या दाखविता येतात आणि वेगळ्या करताही येतात.पण समवाय हा संबंध असा नाही.

समवाय म्हणजे असा संबंध की ज्यात संबंधित वस्तु वेगळ्या दाखविता येतात पण वेगळ्या करता येत नाहीत. आणि समजा वेगळ्या करण्याचा प्रयत्न केलाच तर तो संबंध आणि त्या दोन गोष्टी नष्टच होतात.उदा. कापड आणि धागे,फुलाचा वास आणि फुल, वायू आणि गती, अग्नी आणि उष्णता इत्यादी वस्तुंमधील संबंध दाखविता येतो.पण फुलाचा वास फुलापासून वेगळा करावयाचा प्रयत्न केला की फुल नष्ट होते.हात जोडून नमस्कार करण्याला ही समवाय म्हणता येईल .हात वेगळे केले की नमस्कार नावाची गोष्ट नष्टच होते.

थोडक्यात समवाय ही अतिशय वैशिष्ट्यपूर्ण संबंध प्रकार असून वैशेषिकांशिवाय जगात अन्य कुणी त्याची कल्पना केलेली नाही.तो वस्तूंमधील आंतरीक संबंध आहे.सामान्य आणि विशिष्ट यातील संबंध हा समवाय संबंधच असतो.

### (7) अभाव :

अभाव याचा अर्थ एखादी वस्तु,घटना अथवा व्यक्ति अस्तित्वात नसणे.द्रव्य, गुण, कर्म जसे अस्तित्वात असतात, तसा अभाव अस्तित्वात नसतो. हा एक तार्किक पदार्थ आहे.

"आत्ता ,इथे मडके नाही" या वाक्यात मडके नाही, हे कळते.हाच मडक्याचा अभाव होय. "आज म.गांधी अस्तित्वात नाहीत" या वर्तमानकालिन विधानात म.गांधीचा अभाव जाणवतो, ते नाहीत ही वस्तुस्थिती कळते. वस्तुचा अभाव आणि तिच्या अभावाचे ज्ञान यात फरक आहे.

अभावाची चर्चा करावी लागते.कारण तो एक पदार्थ आहे.म्हणजे ' नाही' या पदाने कोणत्या तरी अर्थाचा निर्देश होतो, तो अर्थ म्हणजे अभाव होय.तो अर्थ ' नसणे ' हा आहे.अभावाचे काही प्रकार केलेले आहेत.

## गुण व द्रव्याचे प्रकार

### (1) द्रव्य (Substance):

अनुभवाचे विश्लेषण करताना वैशेषिकांनी प्रथम पदार्थ सांगितला तो द्रव्य.आपला अनुभव नेहमी कशासंबंधी तरी असतो, त्या अनुभवास काही आश्रय असतो, ते द्रव्य होय. गुणाचा आणि कर्माचा आश्रय ते द्रव्य अशी व्याख्या केलेली आहे.

द्रव्य म्हणजे जे स्वत: होऊन रहाते, जे तर्कदृष्ट्या दुस-यावर अवलंबून नसते ते. वस्तूत बदल घडून येत असताही जे काही टिकून राहते ते द्रव्य होय. उदा.लाख अथवा मेण.उष्णतेने यांचे स्वरुप पार बदलून जात.ते द्रवस्वरुपी होतात. पण तरीही तीच ही लाख, तेच हे मेण असे आपण म्हणतो. *जे द्रवू शकते तरीही टिकून राहते ते*

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

*द्रव्य* अशा रितीने हा शब्द आला असावा.प्रत्यक्ष ज्ञानातील चक्षुरिंद्रियालाच केवळ द्रव्याचे प्रत्यक्ष होते. असे या दर्शनात मानले आहे.

(1) पृथ्वी, (2) जल, (3) तेज, (4) वायू, (5) आकाश, (6) दिक् (अवकाश), (7) काल, (8) आत्मा आणि (9) मन, या नऊपैकी पहिली चार द्रव्ये परमाणूंनी बनलेली व शेवटचे मन हे स्वत:च परमाणुस्वरुपी आहे. बाकीची द्रव्ये विभू मानली आहेत.विभू म्हणजे सर्वव्यापक.ती सर्वांशी सर्वदा संबंध्द असतात.द्रव्य गुण - विशेष आणि सामान्य गुण यांचा संबंध पुढीलप्रमाणे :



| क्र. | द्रव्य | विशेष गुण | सामान्य गुण |
|---|---|---|---|
| 1. | पृथ्वी | रुप, रस, गन्ध व स्पर्श | संख्या |
| 2. | जल | रुप, रस, स्पर्श व द्रवत्व | स्नेह |
| 3. | तेज | रुप, स्पर्श | नैमित्तिक द्रवत्व |
| 4. | वायू | स्पर्श | संख्या, वेग |
| 5. | आकाश | शब्द | |
| 6. | आत्मा | ज्ञान, इच्छा | |
| 7. | दिक्, 8.काल व 9.मन | | संख्या, परिमाण, पृथक्त्व |

1. सामान्य गुण : अनेक द्रव्यांवर एकाच वेळी व एकत्रित राहतात ते गुण .
2.विशेष गुण : एका वेळी एकाच द्रव्यावर राहणारे ते विशेष गुण.
3. वैशिष्ट्य : सर्व गुण स्थूल पृथ्वी, स्थूल जल वगैरेप्रमाणे त्यांच्या परमाणूंवरही असतात.

## (2) गुण आणि गुणाचे प्रकार

गुण हा नेहमी द्रव्यावर आधारित असतो.गुण हा कशाचा तरी म्हणजे कुठल्या तरी द्रव्याचा गुण असला पाहिजे. तो द्रव्यरहित केवळ स्वत: होऊन असू शकत नाही.'कमळ लाल आहे' या ठिकाणी लाल हा *गुण* आहे.कारण तो कमळाच्या ठिकाणी वसतो.कमळ मात्र 'तार्किक दृष्ट्या' दुस-या कोणाच्या आश्रयाने राहत नाही.'[3] थोडक्यात गुण हे द्रव्याश्रयी असतात.

दुसरी गोष्ट गुण हे कधीही स्थिर नसतात. एकसारखे बदलत असतात.तरीही त्यांना स्थिर कल्पून, घनीभूत अवस्थेत आहेत असे मानून गुण हा पदार्थ वेगळा केला आहे.रुप, रस, गंध, स्पर्श, संख्या, परिमाण, पृथक्त्व, संयोग, विभाग, परत्व, अपरत्व, गुरुत्व,द्रवत्व, स्नेह, शब्द, बुध्दी, सुख, दु:ख, इच्छा, द्वेष, प्रयत्न, धर्म, अधर्म व संस्कार असे 24 गुणच मानले आहेत.वैशषिक सूत्रात मूळ फक्त 17 गुण सांगितले आहेत.नंतर गुरुत्व, द्रवत्व, स्नेह, शब्द, धर्म, अधर्म व संस्कार या आणखी सातांची भर पडली.

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

[3] 'तार्किक दृष्ट्या ' हे शब्द महत्वाचे आहेत. कारण भौतिक दृष्ट्या ते जलाच्या आश्रयाने राहते. पण तो दृष्टिकोण येथे प्रस्तुत नाही. वनस्पतिशास्त्राच्या दृष्टीने त्यास महत्व आहे. पण येथे केवळ तार्किक विश्लेषण अभिप्रेत आहे, भौतिक नाही.

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



## आत्म्याचे गुणधर्म

आत्मा या द्रव्याचे जीवात्मा व परमात्मा असे दोन भेद केले आहेत. जीवात्मे अनेक मानले आहेत.कारण सुख-दु:खाचा अनुभव प्रत्येकाला निरनिराळा येतो.परमात्मा एक असून सर्वज्ञ आहे.जीवात्मे अनेक असले तरी ते विभू म्हणजे सर्वव्यापी आहेत व परमेश्वराप्रमाणे तेही नित्यच आहेत.थोडक्यात आत्मा हे नित्य व विभु द्रव्य आहे.

ज्ञान, इच्छा,निश्चय, सुख, धर्म व अधर्म हे आत्म्याचे गुण आहेत. हे गुण दुसऱ्या कोणत्याही द्रव्यात असू शकत नाहीत. आत्मा शरीर, मन व चेतना याहून वेगळा व स्वतंत्र असतो.आत्म्याची उत्पत्ती किंवा विनाश होत नाही. तो नित्य व शाश्वतच असतो.तो शरीरात कोणत्याही विशिष्ट भागत स्थिर नसतो.सर्वत्र असतो. म्हणूनच त्यास विभु म्हणतात.

ज्ञान हा आत्म्याचा केवळ गुण आहे, त्याचे साररूप नाही.ज्ञान व आत्मा यांच्यात समवाय संबंध नसतो.विश्वाचे ज्ञान झाल्यानंतर त्याचा शरीराशी संबंध तुटतो आणि सुख, दु:ख अथवा जाणीव यापैकी कशाचाही अनुभव त्यास येत नाही. जीवात्मा सुखदु:खाचे भोग भोगीत असतो.या दोहोपासून संपूर्ण विराम हे त्याचे ध्येय असते.

आत्मा का मानावा ? तर याची मुख्य काही कारणे सांगता येतील.

1. *स्थिर तत्त्व :* ज्ञान अनुभव व स्मृति यांनी बनते.शरीर बदलत असते. आत्मा बदलतो असे मानल्यास 'स्मृति' संभवणार नाही.कारण स्मृतीला अनुसंधान किंवा सातत्य लागते.पूर्वी जे अनुभविले त्याचे आता स्मरण होणे हे अनुसंधान होय. अनुभवणारा व स्मरणारा एकच असल्याशिवाय स्मृती शक्य नाही. तेव्हा विकारी अशा शरीराहून आत्मा भिन्न असला पाहिजे.
2. *शरीरभिन्न तत्त्व :* हातपाय इत्यादी शरीराचा एखादा अवयव नाश पावला तर तेवढ्या अंशाने शरीरही नाश पावले असे म्हटले पाहिजे. पण त्यामुळे आत्मा नाश पावतो अशी प्रतीती येत नाही.याहून सोपा युक्तिवाद म्हणजे ज्या अर्थी माझे शरीर असा आपण शब्दप्रयोग करतो त्या अर्थी शरीराहून 'मी' हा भिन्नच असला पाहिजे
3. *इंद्रियभिन्न तत्त्व :* ज्ञानेंद्रियांनाही आत्मा मानता येणार नाही.कारण घ्राण, रसना यांसारखे एखादे ज्ञानेंद्रिय नष्ट झाले तरी आत्मा नष्ट झाला असे होत नाही. शिवाय असे की, ज्या मी हा घट पूर्वी पाहिला, तोच आता त्याला स्पर्श करीत आहे अशा प्रकारची प्रतीती आपणांस येते.याचा उघड अर्थ असा की, पाहणे व स्पर्श करणे या भिन्नभिन्न इंद्रियांच्या क्रिया असूनही त्यांचे एकत्वाने ज्ञान करुन घेणारा आत्मा त्या इंद्रियाहून भिन्न असला पाहिजे.
4. *मनभिन्न तत्त्व :* मन म्हणजे आत्मा नव्हे. कारण आत्मा सर्वव्यापी आहे, तर मन हे अणुस्वरुपी आहे.तसे नसते तर आपणांस दोन भिन्न इंद्रियांनी एकदमच प्रत्यक्ष झाले असते.तसे होत नाही.जेव्हा आपण पहातो तेव्हा ऐकू शकत नाहा.याचे कारण मन अणुस्वरुपी असल्याने एका वेळी त्याचा संयोग एकाच इंद्रियांशी होतो.अशा रीतीने शरीर, इंद्रिये व मन यांहून भिन्न व आपल्या ज्ञानाचा आधार असा जीवात्मा मानावाच लागतो.

जीवात्म्याचे ज्ञान (म्हणजे इतरांच्या आत्म्याचे ज्ञान) दोन मार्गाने होते.आपल्याच जीवात्म्याचे ज्ञान मानसप्रत्यक्षाने होते तर इतरांच्या जीवात्म्याचे ज्ञान अनुमानाने होते. मला जसे ज्ञान होते तसे इतरांनाही ज्ञान होते, म्हणून इतरांनाही आत्मा आहे, हे अनुमान होय. ज्ञान या गुणावरुनच त्याची अनुमिती करता येते.

Department of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

## अणुवाद

वैशेषिकांच्या मते जगातील प्रत्येक वस्तू आणि मानवी मन सूक्ष्म अशा परमाणूंनी बनलेले आहे. एखाद्या वस्तूचे लहान लहान भाग करीत गेल्यानंतर ज्याचे आता विभाजन शक्य नाही, अशा भागास *'अणु'* म्हणतात. तो परम म्हणजे शेवटचा अविभाज्य भाग असल्याने *'परमाणु'* होय. प्रत्येक वस्तूचे परमाणु स्वतंत्र असतात. याचाच अर्थ जितक्या वस्तू तितके परमाणु आहेत.म्हणजे अनंत परमाणु आहेत.ही परमाणुंची अनेकता किंवा बहुलता (Pluralism) आहे. म्हणून वैशेषिकांच्या जगाच्या रचनेच्या सिध्दान्तास *'परमाणुप्रधान बहुलतावाद* (Atomic Pluralism)' असेही नाव आहे.परमाणू हे अतींद्रिय असतात. पण त्यांच्या संयोगापासूनच स्थूल पृथ्वी, स्थूल जल स्थूल तेज व स्थूल वायू ही चार कार्यद्रव्ये किंवा महाभूते निर्माण होतात.

20

अणुचे प्रकार बनतात.धूलिकण,सूर्यकिरण इत्यादीचा अणु एकाणू असतो.दोन परमाणुंचा बनतो तो द्व्यणुक, तीन परमाणुंचा बनतो तो ' त्र्यणुक किंव त्रसरेणु' होय.

## परमांणूच्या अस्तित्वाची तीन कारणे

### (1) बाह्येंद्रियांना ज्ञात होणारे मध्यमपरिमाणी.

मध्यमपरिमाण म्हणजे जे सर्वव्यापी विभुद्रव्यावर आणि अत्यंत सूक्ष्म अशा अणूवरही नसते ते परिमाण होय.मध्यमपरिमाणी द्रव्यास स्थूलद्रव्य म्हणतात. कोणत्याही स्थूल द्रव्यास अवयव असतात.या अवयवाचेही विभाग पाडता येतात. विभाजनक्रिया थांबली की परमाणू मिळतात

### (2) परिमाण समानतेची आपत्ती .

परमाणु-सिध्दान्त मानला नाही तर कोणत्याही स्थूल द्रव्याचे अनंत अवयव मानावे लागतील.तसे मानल्यास मेरु पर्वत व एक मोहरी या दोहोंचेही अवयव अनंत म्हणजे समानच होतील.दोहोंचे अवयव समान झाल्याने त्यांचे परिमाणही समानच आहे असे मानण्याची आपत्ती येईल.ही आपत्ती टाळण्यासाठी कोणत्याही स्थूल द्रव्याचे घटक परमाणू आहेत असे मानणे योग्य ठरेल.

### (3) परमाणु नित्यत्व :

पुस्तक, खुर्ची, घर यासारख्या ज्या स्थूल द्रव्य पदार्थांशी आपला नेहमी संबंध येतो, त्या अनित्य असतात हे उघड आहे.'अनित्य' हा शब्द 'नित्य' या शब्दाला 'अ' हा नञात्मक उपसर्ग लावून सिध्द झाला आहे.तेव्हा काही तरी नित्य असल्याशिवाय अनित्य या शब्दाला मुळी अर्थच येणार नाही.ज्या नित्य द्रव्यांच्या अपेक्षेने आपण या स्थूल द्रव्यांना अनित्य म्हणू, ती नित्य द्रव्ये म्हणजेच परमाणू.

द्रयणुकाचे जे अवयव ते परमाणु.दोन परमाणुंच्या संयोगाने एक द्रयणुक बनते व तीन द्रयणुकांच्या संयोगाने एक त्र्यणुक बनते. त्र्यणुकापासून चतुरणुक वगैरे क्रमाने स्थूल पृथ्वी, स्थूल जल वगैरे उत्पन्न होऊन त्यांच्या निरनिराळ्या मिश्रणांनी आपल्याभोवतीचा स्थूल सृष्टीचा पसारा बनलेला आहे असे वैशेषिक मानतात.

निरनिराळया द्रव्यांचे परमाणू जेव्हा अत्यंत विभक्त अवस्थेत असतात, तेव्हा सृष्टीच्या त्या अवस्थेस प्रलय म्हणावयाचे.प्रलयानंतर ईश्वराच्या मनात सृष्टी उत्पन्न करावी अशी इच्छा उत्पन्न होते.त्या इच्छेने प्रेरित होऊन व आत्म्यांच्या पूर्वजन्मीच्या कर्मांनी निर्माण झालेले अदृष्ट लक्षात घेऊन परमेश्वर परमाणूंपासून स्थूल सृष्टी वर

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*



सांगितलेल्या क्रमाने निर्माण करतो. पुढे प्राणिमात्रांच्या कर्मामुळे सृष्टिसंहाराची वेळ आली म्हणजे परमेश्वराच्या इच्छेने स्थूल द्रव्याचे विघटन होत होत अखेर केवळ परमाणूच राहतात.

या संहारक्रमासंबंधी दोन मते आहेत.

एक मत असे की, त्र्यणुकाचे विभजन द्वयणुकात होत व द्वयणुकाचे विभजन होऊन परमाणू उरतात.

दुसरे मत असे की, आधी द्वयणुक नाहीसे झाल्याशिवाय त्र्यणुकाचा नाश होत नाही. 'समवायिकारणनाशात् कार्यनाश:' या सिध्दान्ताला हे मत घट्ट धरुन ठेवते.

पहिले मत नवनैयायिकाचे व दुसरे वैशेषिकांचे.

## ग्रीक परमाणुवाद व वैशेषिकांचा परमाणूवाद

कीथ (Keith) या पंडिताच्या मते प्राचीन काळी भारत व ग्रीस यांमध्ये खूपच दळणवळण होते. त्यामुळे परमाणु सिध्दान्त वैशेषिकांनी ग्रीकांपासून घेतला असला पाहिजे.पण हे मत अत्यंत स्वीकारता येत नाही. एक कारण म्हणजे कालदृष्टया वैशेषिक परमाणुवाद आधीचा, की ग्रीक परमाणुवाद आधीचा हे सांगणे कठिण आहे.

अधिक महत्वाचे कारण म्हणजे त्या दोन परमाणुवादांत काही मौलिक फरक आहेत, हे होय. परमाणुवादास अतिशय उपकारी अशी भिन्न भिन्न परिमाणांची कल्पना वैशेषिक मतात आहे. तिचा मागमूसही ग्रीक तत्वज्ञानात नाही.परमाणुवादातील अंगभूत अडचणींची चर्चा ग्रीसमध्ये झाली. पण भिन्न भिन्न परिमाणांची कल्पना त्यांना सुचली नाहा.दुसरा फरक याहून अधिक महत्वाचा आहे. तो असा की वैशेषिकांनी कालांतराने 'अभाव' नावाचा स्वतंत्र पदार्थ सुध्दा मानला, ग्रीकांनी नाही. .याचा उघड उघड अर्थ असा की, हे दोन्ही परमाणूवाद मूलत: भिन्न आहेत.

## अभावांचे प्रकार

वैशेषिकांचा मते शेवटाचाम नववा पदार्थ अभाव हा होय. मूळ वैशेषिक सूत्रांत याचा उल्लेख नाही त्याचा समावेश पदार्थांच्या यादीत नंतर झाला.तो होणे अपरिहार्य होते. अभाव म्हणजे काहीच नाही. पण नाही नाही असे म्हणत असताच आपण त्याच्यासंबंधी बोलतो.पण ज्याच्यासंबंधी आपण बोलतो ते काहीतरी असलेच पाहिजे, त्याला काही अर्थ असला पाहिजे, नाहीतर आपण अर्थशून्य बडबडतो असे म्हणण्याचा प्रसंग येईल.आपल्या बोलण्याचा जो अर्थ, पदांचा जो अर्थ तोच पदार्थ होय.हा तार्किक पदार्थ आहे.वास्तविक नाही.

वात्सायन या वैशेषिक पंडिताने अभावाचे प्रकार केले :

अभाव : 1) संसर्गाभाव 2) अन्योन्याभाव
→ प्रागभाव, प्रध्वंसाभाव, अत्यंताभाव

1. *संसर्गभाव* : संसर्ग म्हणजे संबंध. अस्तित्वाशी संबंध नसणे (=अस्तित्व नसणे) म्हणजे संसर्गाभाव.
2. *अन्योन्याभाव* : अन्योन्याभाव म्हणजे एका वस्तुने दुसरी वस्तू नसणे, प्रत्येक वस्तूचा अलगपणा, जसे, गाईने घोडा नसणे. जगातील प्रत्येयक वस्तू जी आहे ती तीच आहे, दुसरी नाही. प्रत्येक वस्तूसंबंधीचे हे सत्य म्हणजेच अन्योन्याभाव होय. अन्योन्याभावाचा वस्तूचे अस्तित्वात असणे अगर नसणे याच्याशी काहीही संबंध नाही.तो वस्तूच्या स्वभावाने सिध्द होतो.
3. संसर्गभावाचे तीन उपप्रकार आहेत: प्रागभाव, प्रध्वंसाभाव व अत्यंताभाव .

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

*Prof. Shriniwas Hemade, hodhilosophy@sangamnercollege.org, 9226 56 30 52*

a. *प्रागभाव :* कोणतीही वस्तू उत्पन्न होण्याच्या क्षणापूर्वीचा तिचा अभाव. या अभावास अर्थात अमुक वेळी सुरवात झाली असते असे नाही. तो अनादी असतो. पण त्यास अंत असतो. वस्तु अस्तित्वात येताक्षणीच तो नष्ट होतो. घटाचा प्रागभाव तो घट अस्तित्वात आल्याक्षणीच नष्ट पावला.

b. *प्रध्वंसाभाव :* कोणतीही वस्तू नष्ट झाली म्हणजे तिचा प्रध्वंसाभाव सुरु होतो.घट फोडला म्हणजे घटाचा प्रध्वंसाभाव निर्माण होतो. त्याला आदि आहे, पण अंत नाही. कारण तीच वस्तू, अगदी तीच वस्तू (तसलीच नव्हे) परत जशीच्या तशी अस्तित्वात येणे शक्य नाही.



c. *अत्यंताभाव :* हा अभाव प्रत्येक वस्तूला संभवतो. जी वस्तू अस्तित्वात आहे, ती अस्तित्वात नसणे याला नेहमीच अर्थ राहणार. भूमीवर घट असला तरी त्याच ठिकाणी घटाभाव असतो.कारण, तो घट येथे नसणे या कल्पनेस आपण अर्थ देऊ शकतो.शक्यता म्हणून तो अभाव येथे सदोदित असतोच.प्रत्यक्ष घट असते वेळी या अभावाचे ग्रहण करण्यास थोडी अडचण येईल हे खरे.पण म्हणून तो अभाव नसतो असे नाही.हा अनादी व अनंत आहे.

## न्याय आणि वैशेषिक यांचा संबंध

न्याय व वैशेषिक ही दर्शने एकमेकांचा 'समानतंत्र' म्हणून उल्लेख करतात.त्या दोघांची काही समान भूमिका आहे. ती अशी

(1) ही दोन्ही दर्शने वस्तूंचे ज्ञाननिरपेक्ष स्वतंत्र अस्तित्व मानतात. पाश्चात्य परिभाषेत ही वास्तववादी तत्त्वज्ञाने होत. realistic

(2) दोन्ही दर्शने अनेकतत्ववादी अथवा भेदवादी आहेत. अंतिम पदार्थ अनेक आहेत असे ती मानतात.

(3) सर्वसामान्य माणसाच्या नित्याच्या व्यवहाराचा पाठपुरावा करावा, असा त्यांच्या सिध्दांन्त आहे. सर्व-साधारणत: आपण असे पाहतो की, तत्वज्ञान सामान्य माणसाच्या ज्ञानाला चुकीचे ठरविते.व्यावहारिक ज्ञान हे येथून तेथून भ्रमाने ग्रस्त आहे असे सांगण्यासाठीच जणू तत्वज्ञानाचा अवतार आहे, असा भास कित्येकदा होतो.पण न्याय-वैशेषिक मोठ्या हिरीरीने सामान्य माणसाच्या सा-या व्यवहारांचे समर्थन करीत असतात. सामान्य माणसाच्या व्यावहारिक दृष्टिकोणाचे तात्विक समर्थन हीच न्यायवैशेषिकांची मूलभूत प्रेरणा आहे.

(4) याचा अर्थ असा नव्हे की, ही दर्शने सोपी आहेत ! व्यावहारिक दृष्टिकोण समजावयास व स्वीकारावयास सहज आणि सोपा खरा. पण त्याचे तात्विक समर्थन हे जटिल आणि जडजंबाल होऊ शकते.तशी ही दर्शने आहेतही. सामान्य माणसाच्या व्यावहारिक दृष्टिकोणाचे समर्थन करण्यासाठीच ही दर्शने धडपडत असतात.वैशेषिक दर्शन स्वत:ला अनुभवशरण म्हणविते. 'वस्तूचे ज्ञान करुन देण्यास आम्ही शेवटी अनुभवालाच शरण जातो' *(संविदेव हि भगवती वस्तूपगमे न: शरणम्।)*

(5) पाश्चात्य तत्त्वज्ञानातील logical positivism या विचार-पध्दती व ही दर्शने यांच्यात बरेच साम्य आहे. पण ही दर्शने त्यापेक्षा प्राचीन आहेत.अर्थात या साम्याला ब-याच मर्यादा आहेत. उदाहरणार्थ पारंपारिक विचाराला आणि श्रध्दांना धक्का न देणे हे न्यायवैशेषिकांनी योग्य मानले, तर उलट logical positivism असे धक्के देत राहिले.

(1) दर्शनांची नामावळी सांगताना 'न्याय-वैशेषिक' असा जोडगोळीने उल्लेख करण्याची पध्दती आहे. कारण, दोन्ही दर्शने भिन्न असूनही आता ती अतिशय एकरुप झाली आहेत.विश्वाकडे पाहण्याचा दोघांचा

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner

दृष्टिकोण एकच आहे व मुख्यत: त्यामुळेच दोघांचे तात्विक सिध्दांत आणि ज्ञानमीमांसाही जवळजवळ एकच झाली आहे.

असे असले तरी ऐतिहासिक अनुसंधान सांभाळण्यासाठी दोन्ही दर्शनांची मांडणी अलग करण्याची प्रथा आहे.त्यासाठी त्या दोहोंमध्ये स्थूल मानाने फरक करावयाचा तो असा:-

ज्ञानमीमांसेसंबंधीचे प्रश्न ईश्वरास्तित्वासंबंधीचा युक्तिवाद आणि कार्यकारणसंबंधांचे स्वरुप एवढा भाग न्यायदर्शनाचा मानावा आणि जगातील सर्व ज्ञेय पदार्थांची व्यवस्था हा भाग वैशेषिक दर्शनाचा समजावा.

थोडक्यात न्याय हे प्रामुख्याने प्रमाणशास्त्र आणि वैशेषिक हे प्रमेयशास्त्र होय.

------------------------------------------------------

Department Of Philosophy, Sangamner College, Sangamner